## ‘मेट्रो ३’च्या पहिल्या गाडीचे चार डबे दाखल

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ भुयारी मार्गिकेतील पहिल्या मेट्रो गाडीचे चार डबे अखेर मंगळवारी पहाटे मंबईत दाखल झाले आहेत. मरोळ-मरोशी (सारीपूत नगर) येथील तात्पुरत्या कारशेडमध्ये डबे दाखल झाले असून आता हे डबे रुळावर ठेवण्यात येणार असल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (एमएमआरसी)कडून सांगण्यात आले आहे. तसेच उर्वरित चार डबे लवकरच आंध्र प्रदेशातील श्रीसिटीतून मुंबईत दाखल होतील. त्यानंतर मेट्रो गाडीची जुळणी करून तात्पुरती कारशेड ते मरोळ नाका अशी तीन कि.मी. लांबीदरम्यान चाचणी घेण्यात येणार असल्याचेही एमएमआरसीने सांगितले. **वृत्त...३**

# ‘मेट्रो ३’च्या पहिल्या गाडीचे चार डबे दाखल

## उर्वरित चार डबे आल्यानंतर तीन कि.मी.च्या मार्गावर होणार चाचणी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ भुयारी मार्गिकेतील पहिल्या मेट्रो गाडीचे चार डबे अखेर मंगळवारी पहाटे मंबईत दाखल झाले आहेत. मरोळ-मरोशी (सारीपूत नगर) येथील तात्पुरत्या कारशेडमध्ये डबे दाखल झाले असून आता हे डबे रुळावर ठेवण्यात येणार असल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (एमएमआरसी)कडून सांगण्यात आले आहे. तसेच उर्वरित चार डबे लवकरच आंध्र प्रदेशातील श्रीसिटीतून मुंबईत दाखल होतील. त्यानंतर मेट्रो गाडीची जुळणी करून तात्पुरती कारशेड ते मरोळ नाका अशी तीन कि.मी. लांबीदरम्यान चाचणी घेण्यात येणार असल्याचेही एमएमआरसीने सांगितले.



मेट्रो ३ मार्गिकेतील सीप्झ ते बीकेसी असा पहिला टप्पा २०२४ मध्ये पूर्ण करण्याचे एमएमआरसीचे नियोजन आहे. त्यानुसार मार्गिकेच्या बांधकामाला वेग देण्यात आला आहे. मात्र कारशेडचा वाद अद्याप सुटलेला नाही. कांजुरमार्गवरून पुन्हा आरे येथे कारशेडमध्ये हलविण्यात आले आहे. तसेच राज्य सरकारने आरेतील बांधकामावरील स्थगिती उठविण्यात आली आहे. त्यानंतर एमएमआरसीने आरे कारशेडमधील कामास सुरुवात केली आहे. मात्र हे काम करताना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन एमएमआरसीने केले आहे. झाडांची बेकायदा कत्तल करून काम सुरू केल्याचा आरोप पर्यावरणप्रेमींनी केला असून या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी अपेक्षित आहे.

एमएमआरसीकडून मात्र बांधकाम आणि आता कारशेडचे काम वेगात सुरू आहे. कारशेडचे काम सुरू करतानाच एमएमआरसीने श्रीसिटीतून पहिली गाडी आणण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार मंगळवारी गाडीचे चार डबे मुंबईत दाखल झाले आहेत. श्रीसिटी येथे मेट्रो ३ साठी ३१ गाड्यांची बांधणी केली जात आहे. यातील एक गाडी तयार होती. मात्र तात्पुरत्या कारशेडचे काम अपूर्ण असल्याने ही गाडी मुंबईत आणणे एमएमआरसीला शक्य होत नव्हते.

### तात्पुरती कारशेड ते मरोळ नाका चाचणी

ही गाडी आणण्यातील सर्व अडचणी एमएमआरसीने अखेर सोडविल्या आहेत. त्यानुसार दोन आठवड्यांपूर्वी आठ डब्यांच्या गाडीतील चार डबे मुंबईसाठी रवाना झाले होते. साधारण १४०० कि.मी.चे अंतर पार करून मंगळवारी पहाटे तात्पुरत्या कारशेडमध्ये दाखल झाल्याची माहिती एमएमआरसीकडून देण्यात आली आहे. उर्वरित डबे लवकरच मुंबईत येतील. हे डबे आल्यानंतर गाडीची जुळणी करण्यात येईल. त्यानंतर तात्पुरती कारशेड ते मरोळ नाका अशी तीन किमी लांबीच्या मार्गिकेवर मेट्रोची चाचणी होईल, असेही एमएमआरसीकडून सांगण्यात आले आहे. गाडी मुंबईत येणे आणि चाचणी होणे हे प्रकल्प पुढे नेण्याच्या दृष्टीने मोठे टप्पे आहेत. मात्र कारशेडचा वाद पूर्णतः संपुष्टात येत नाही, तोपर्यंत मेट्रो ३ मार्गिकेचा पहिला टप्पा सुरू करण्याचा मार्ग मोकळा होणे अवघड असल्याचे म्हटले जात आहे.